# 'लायन्स क्लब' तर्फे आरोग्य शिबीर

**औरंगाबाद :** लायन्स क्लब औरंगाबाद मिडटाऊनतर्फे मध्यवर्ती कारागृह हर्सूल येथील कैद्यांसाठी त्वचारोग तपासणी व स्त्री रोगनिदान, तसेच औषधोपचार शिबीर घेण्यात आले.

यावेळी २७५ जणांची तपासणी करण्यात आली. डॉ. अनिरुद्ध गुलाणीकर, डॉ. गौरव साळवे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शैलजा कसबेकर, डॉ. वर्षा देशपांडे यांनी तपासणी केली.

याप्रसंगी लायन्स क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष सीताराम अग्रवाल, सेक्रेटरी अनिल माली, कोषाध्यक्ष रवी वट्टमवार, डॉ. सुनील कसबेकर, प्रवीण मुगदिया, प्रांतपाल कमल मीनसिंगका, माजी प्रांतपाल नवल मालू, माजी प्रांतपाल महावीर पाटणी, झोन चेअरमन रवी खिंवसरा, विभाग अध्यक्ष शांतीलाल छप्परवाल आदींची उपस्थिती होती. या उपक्रमाबद्दल कैद्यांनी आभार व्यक्त केले.